२५६

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.

कार्यालयीन आदेश क्रमांक १७७ -3 JAN 2000

विषय :- जवाहर रोजगार योजनेचे लेखा परीक्षणासाठी श्रमदिन निश्चित करणे आणि अहवाला सोबतची प्रपत्रे कमी करणेबाबत.

संदर्भ :- महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील उपमुख्य लेखा परीक्षक [व] यांच्या सभेचा इतिवृत्त क्र.स्था१८/ब/सभा/अेअेअे/२१६७ दि. २१.१२.९९.

जवाहर रोजगार योजनेचे लेखा परीक्षण परिणामकारक होण्याच्या दृष्टीने किती श्रमदिन लागतील तसेच अहवालासोबत जी प्रपत्रे आहेत ती कमी करणे त्यात सुधारणा करणे याबाबतचा अहवाल यापूर्वी गठीत समितीने सादर केलेल्या अहवालावर संदर्भिय सभेत सांगोपांग चर्चा होऊन त्यावर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१] जवाहर रोजगार योजना लेखा परीक्षकास एका घटकास एक श्रमदिन या प्रमाणे श्रमदिन कायम करण्यात यावे.
२] नमुना "अ" कायम करण्यात यावा.
३] नमुना "ब" रदद करण्यात यावा.
४] नमुना "क" मधिल स्तंभ १ ते ६ कायम ठेवण्यात यावे.
५] जवाहर रोजगार योजनेच्या लेखा परीक्षण अहवाला सोबत उपरोक्त प्रमाणेची "अ,ब,क" विवरण पत्रे जोडावयाची आहेत ती विवरण पत्रे ग्रामपंचायतीला पाठविण्यात येणाऱ्या लेखा परीक्षणाच्या सुचना पत्रासोबत संबंधित ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावीत व लेखा परीक्षण सुरु होण्याच्या दिनांकास ती भरुन ठेवण्याच्या सूचना देण्यात याव्यात. ही सुधारीत पध्दत दि. १ फेब्रुवारी २०००. पासुन घेण्यात येणाऱ्या लेखा परीक्षणापासून अंमलात येईल. नमुना अ व क ही विवरणपत्रे सुधारणा करुन चक्रमुद्रित करुन ग्रामपंचायतींना लेखा परीक्षण वर्षाच्या प्रमाणात पुरवावयाची आहेत.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, म.रा.
नवी मुंबई.

प्रति,
१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ], स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव. (२प्रती)

....२/-